कोकण आता मुंबई-पुण्याच्या तोडीस तोड ठरणार-एकनाथ शिंदे

रत्नागिरी, दि. ३ : प्रतिनिधी

"कोकण आता विकासाच्या शर्यतीत मागे राहणार नाही. मुंबई, पुणे आणि नागपूरच्या रांगेत कोकणाला उभं करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत," अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रत्नागिरीतील साळवी स्टॉप येथील सभेत विरोधकांना ललकारले. केवळ रस्तेच नव्हे, तर उद्योगांची समृद्धी थेट गावागावात पोहोचवण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कोकणच्या ७२० किलोमीटर लांबीच्या समुद्रकिनाऱ्याचा कायापालट करण्यासाठी शिंदे यांनी ११ 'ग्रोथ सेंटर्स'ची घोषणा केली. ही केंद्रे कोकणच्या अर्थव्यवस्थेसाठी इंजिन म्हणून काम करतील, ज्यामुळे स्थानिक तरुणांना नोकरीसाठी गाव सोडून मुंबईला जावे लागणार नाही. मत्स्य उद्योग, काजू, नारळ आणि आंबा प्रक्रियेसाठी विशेष पॅकेज देऊन स्थानिक उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून दिली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

कोकणाला 'ग्लोबल व्हिलेज' बनवण्याची संकल्पना मांडताना शिंदे म्हणाले की, कोस्टल रोड कनेक्टिव्हिटी, वॉटर स्पोर्ट्स आणि रिसॉर्ट्सच्या माध्यमातून कोकण आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे मुख्य केंद्र बनेल. दाभोळ खाडीवरील पूल आणि ग्रामीण भागातील पानंद रस्त्यांच्या जाळ्यामुळे दळणवळण अधिक वेगवान होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना शिंदे 'लाडकी बहीण' योजनेवर आक्रमक झाले. "ही योजना कधीच बंद होणार नाही. ४५ हजार कोटींचा खर्च झाला तरी चालेल, पण भगिनींना दिला जाणारा हा आधार सुरूच राहील," असे त्यांनी ठामपणे सांगितले. यासोबतच शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला मिळणारे १२ हजार रुपये आणि पीक विमा योजनेमुळे बळीराजाला मोठा दिलासा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सहायता निधीतून ७ हजार बालकांच्या हृदय शस्त्रक्रिया झाल्याचा उल्लेख करत त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेची मर्यादा १.५ लाखांवरून ५ लाखांपर्यंत वाढवल्याचे सांगितले. महिलांच्या कॅन्सर तपासणीसाठी मोबाईल व्हॅन्स आणि बचत गटांना मिळणारे प्रोत्साहन, यातून महिला सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"आमचा अजेंडा खुर्चीचा नाही, तर कोकणच्या भवितव्याचा आहे," असे म्हणत ७ फेब्रुवारीला धनुष्यबाण आणि कमळाच्या चिन्हासमोर बटण दाबून महायुतीचा भगवा फडकवण्याचे आवाहन त्यांनी केले.

पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासासाठी आवश्यक भूसंपादन गतीने पूर्ण करावे - मुख्यमंत्री

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

राज्यात पायाभूत सुविधा तसेच औद्योगिक विकासासाठी भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ही प्रक्रिया गतीने आणि पारदर्शक पद्धतीने राबवावी, प्रकल्पांसाठी जमीन देणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) विविध प्रकल्पांसाठी सुरू असलेल्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीस उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलरासु, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्यासह सर्व संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.

राज्यात औद्योगिक विकासासाठी विविध विभागांमध्ये एकूण ८,९६९ एकर क्षेत्र उपलब्ध असून नव्याने २०,४३१ एकर

जमीन ताब्यात घेण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात औद्योगिक गुंतवणुकीसाठी मोठी मागणी येत असून उद्योजकांना लागणाऱ्या जागेचा विचार करुन एमआयडीसीने एक लाख एकर जागा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. मुंबई-पुणे-नागपूर बरोबरच नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आदी भागांमध्ये गुंतवणूकदारांकडून जमिनीची मागणी वाढत आहे. याद्दष्टीने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादनाच्या कामांना गती द्यावी. यासाठी शासन स्तरावरून आवश्यक ते साहाय्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

विविध जिल्ह्यातील 'एमआयडीसी'च्या भूसंपादनाबरोबरच 'एमएसआरडीसी'कडील शक्तिपीठ एक्स्प्रेस वे, विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, नागपूर-गोंदिया एक्स्प्रेस वे, भंडारा-गडचिरोली एक्स्प्रेस वे, नागपूर चंद्रपूर एक्स्प्रेस वे, नवेगाव-सुरजागड मिनरल कॉरिडॉर, जालना नांदेड एक्स्प्रेस वे आदी प्रकल्पांच्या सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेचाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी आढावा घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सुरू असलेले सर्व प्रकल्प येत्या तीन वर्षात पूर्ण होतील, असे नियोजन करावे. यासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी. त्याचबरोबर वनक्षेत्र नसलेल्या जास्तीत जास्त सलग जागेचे भूसंपादन करुन ती उद्योजकांना उपलब्ध करुन द्यावीत. याशिवाय, विविध विभागाकडील शासकीय जमिनी औद्योगिक वापरासाठी विनामूल्य हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव सादर करावा, यामुळे उद्योजकांना कमी दरात भूखंड उपलब्ध होऊन राज्यातील औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांनी, कोकणातील भूसंपादन प्रक्रियेदरम्यान कुठेही वन जमिनीचे संपादन केले नसल्याची माहिती दिली. बैठकीत 'एमआयडीसी' आणि 'एमएसआरडीसी'च्या वतीने विविध ठिकाणी सुरू असलेल्या भूसंपादनाच्या सद्यस्थितीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.

मुंबई वृत्तपत्र लेखक संघ यांची दिनदर्शिका प्रकाशन, पिशव्या वाटप व पुस्तक प्रकाशन

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

कुर्ला - मुंबई वृत्तपत्र लेखक संघ यांची रंगीत व एक पानी दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन सोहळा तसेच वाटप नुकतेच नेहरू नगर, कुर्ला पूर्व,मुंबई येथे उदघाटक - प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना उबाठा गटाच्या मा.नगरसेविका,बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य समितीच्या माजी अध्यक्षा सौ. प्रविणाताई मनिष मोरजकर आणि विशेष अतिथी म्हणून निष्ठावंत शिवसैनिक पदधिकारी मनिषभाऊ मोरजकर यांच्या हस्ते नुकताच संपन्न झाला आहे. संस्थेच्या कार्यकारी सदस्या सौ माधवी संजय साळगांवकर यानी सर्वांचे स्वागत केले. संस्थेचे खजिनदार तथा माजी अध्यक्ष व संयोजक संजय गंगाराम साळगांवकर यानी प्रस्ताविका मांडली. संस्थेकडून पाहुण्याना शाल व पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार केला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे नवनियुक्त अध्यक्ष व आदिवासीसेवक डॉ सुभाष रामचंद्र सोनंदकर,समाजसेवक व संस्थेचे उपक्रम यशस्वी होण्यासाठी आर्थिक मदत वेळोवेळी करणारे,सेक्रेटरी-प्रमुख कार्यवाह सुभाष लक्ष्मण कोकणे,संस्थेचे सर्व चारही माननीय सल्लागार - वरिष्ठ वृत्तपत्र लेखक माजी अध्यक्ष अनंत दत्ताराम दाभोळकर, पत्रकार शशिकांत राजाराम सावंत,दिनेश यादव आणि राष्ट्रपती पदक विजेते,साहित्यिक, म राज्य पर्यटन व कला सांस्कृतिक महोत्स समितीचे उपाध्यक्ष डॉ.खंडु रघुनाथ माळवे(खरमा), कवी व वृत्तपत्र लेखक तथा कार्यकारी सदस्य परेश विश्वास नावडकर आणि रोहिदास समाज पंचायत संघ मुंबई यांचे माजी संघविश्वस्त छगन शिवराम खेडेकर आदी मान्यवर उपस्थित राहून त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. पाहुण्याच्या हस्ते संघाची २०२६ ची दिनदर्शिकाचे प्रकाशन व वाटप करण्यात आले. प्रमुख कार्यवाह आणि पाहुणे यांच्या हस्ते पिवळ्या रंगाच्या कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले आणि संघाचे पदधिकारी,वृत्तपत्र लेखक व कवी परेश विश्वास नावडकर यांचे विचारात्मक दृष्टी या त्यांच्या पुस्तकाचे नगरसेविका सौ प्रविणाताई मनिष मोरजकर यांच्या हस्ते प्रकाशन संपन्न झाले. संस्थेच्या संयुक्त कार्यवाह पदावर असलेले कै संतोष राजाराम कोंकाटी यांचे अलिकडेच निधन झाले होते त्यानिमित्याने दोन मिनिटे स्तब्ध राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. संस्थेची दिनदर्शिका २०२६ ची डिझाईन सुंदर असून संस्थेची नियमावली,पदधिकारीचा जन्मदिवस व शुभसंदेश इत्यादी माहिती आहे. संस्थेचे हिशोब तपासणीस दिलीप रामजी आंबेकर,कार्यकारी सदस्य सुनिल गंगाराम साळगांवकर, सदस्या कु अपूर्वा संजय साळगांवकर इत्यादींनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी हातभार लावला.

मुंबई मरिना प्रकल्पासाठी अदानी समूह उत्सूक; पाच कंपन्यांची निविदा

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

मुंबईला जागतिक दर्जाचे पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी १२ हेक्टर जागेवर मरिना प्रकल्प विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या बांधकाम, संचालन आणि देखभालीसाठी मुंबई बंदर प्राधिकरणाने मागविलेल्या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. यासाठी एकूण पाच कंपन्यांनी निविदा सादर केल्या असून यात अदानी समूहाच्या सेमइंडिया प्रोजेक्टस लिमिटेडचा समावेश आहे. या निविदांची छाननी करून त्यांनतर आर्थिक निविदा खुल्या करण्यात येतील, त्यानंतर निविदेत कोण बाजी मारेल हे स्पष्ट होईल. मुंबई बंदर प्राधिकरणाच्या माध्यमातून प्रिन्सेस डॉक येथे १२ हेक्टर जागेवर मरिना विकसित केले जाणार आहे. या प्रकल्पासाठी ८८७



कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. सार्वजनिक-खासगी सहभागातून हा प्रकल्प राबवविण्यात येणार आहे. या मरिना प्रकल्पात ३० मीटर लांबीपर्यंतच्या ४२४ लहान, मोठ्या नौका (यॉटस) उभ्या करता येणार आहेत. या प्रकल्पात मुख्य मरिना टर्मिनल इमारत बांधण्यात येणार असून नमो भारत इंटरनॅशनल सेलिंग स्कूल, सागरी पर्यटन विकास केंद्र, हॉटेल्स, क्लबहाऊस आणि नौका दुरुस्ती सुविधा असणार आहेत. तर बँक, एटीएम केंद्र, वाहनतळ, टॅक्सी वाहनतळ, सभागृह, हॉल, सुपर मार्केट आदी सुविधाही येथे विकसित केल्या जाणार आहेत. तर बोटी उभ्या करण्यासाठी किनारपट्टीपासून ५२३ मीटर आत समुद्रात जागा असणार आहे. या प्रकल्पाच्या बांधकाम, संचालन, देखभालीसाठी मुंबई बंदर प्राधिकरणाकडून काही दिवसांपूर्वी निविदा मागविण्यात आल्या होत्या. नुकत्याच तांत्रिक निविदा खुल्या करण्यात आल्या असून या निविदा प्रक्रियेस चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

आता मरिना प्रकल्पासाठीही अदानी समूह उत्सूक असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान आता मुंबई बंदर प्राधिकरण तांत्रिक निविदांची छाननी करणार आहे. त्यानंतर आर्थिक निविदा खुल्या करण्यात येतील. आर्थिक निविदेत बाजी मारणारी कंपनी हा प्रकल्प मार्गी लावले. त्यामुळे आता निविदेत कोण बाजी मारते हे पाहणे महत्त्वाचे आहे.

कॅन्सरला हरवण्याचा 'विश्वास'
कॅन्सरग्रस्त ४० मुलांच्या मोफत उपचारांचा संकल्प

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

मुंबईत कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी एका संगीतमय संध्याकाळीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कॅन्सरवर मात केलेल्या अभिनेत्री महिमा चौधरी यांनी उपस्थिती लावली. 'विश्वास' या संस्थेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात कॅन्सर रुग्णांच्या सेवेत कार्यरत असलेल्या डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. महिमा चौधरी यांनी स्वतःच्या कॅन्सरवर मात करण्याच्या अनुभवाची कथा सांगून रुग्णांचे मनोबल वाढवले.

या प्रसंगी 'विश्वास' संस्थेचे अध्यक्ष सुरेश अग्रवाल यांनी कॅन्सरग्रस्त ४० मुलांच्या मोफत उपचारांची घोषणा केली. ही संस्था गेल्या २४ वर्षांपासून कॅन्सर रुग्णांच्या मदतीसाठी कार्यरत असून, त्यांना राहण्याची सोय उपलब्ध

करून देते तसेच उपचारासाठी सहाय्य करते.

सुरेश अग्रवाल यांच्या पत्नी ललिता अग्रवाल यांनी सांगितले की, संस्थेची सुरुवात त्यांच्या घरी रुग्णांना आसरा देण्यापासून झाली होती आणि आज ती एक मोठ्या चळवळीत रूपांतरित झाली आहे. पती-पत्नी दोघांनीही आपले आयुष्य कॅन्सर रुग्णांच्या सेवेसाठी समर्पित केले आहे. या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या मान्यवरांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि हे कार्य भविष्यातही असेच सुरू राहावे, अशी आशा व्यक्त केली.

महानगरपालिकेच्या पूल विभागातील अधिकारी, अभियंत्यांचा सन्मान

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

मुंबईतील महत्त्वाच्या पुलांचे बांधकाम विहित वेळेत पूर्ण करण्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूल विभागातील अधिकारी, अभियंत्यांचा मोलाचा वाटा आहे. या अधिकारी आणि अभियंत्यांना बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजित

बांगर, प्रमुख अभियंता (पूल) श्री. उत्तम श्रोते यांच्यासह पूल विभागातील अभियंते उपस्थित होते. यावेळी प्रमुख अभियंता (पूल) श्री. उत्तम श्रोते यांचाही सेवानिवृत्तीनिमित्त महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी पुष्पगुच्छ देवून सन्मान केला.

महानगरपालिकेच्या पूल विभागाने वांद्रे पूर्व आकाशमार्गिका (Skywalk), बेलासिस पूल (Bellasis Bridge), सफेद पूल (Safed Pool) अतिशय उत्तररित्या उभारले. या प्रकल्पांची कामे प्रशासकीयदृष्ट्या आव्हानात्मक होती. या कामाबद्दल संबंधित प्रकल्पातील अधिकारी-अभियंत्यांना प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

यामध्ये वांद्रे पूर्व आकाशमार्गिका उभारण्यात मोलाचा वाटा असणारे कार्यकारी अभियंता श्री. नामदेव रावकाळे, सहायक अभियंता श्री. प्रशांत जावळे, दुय्यम अभियंता श्री. समीर मोरे, दुय्यम अभियंता श्री. अमित दसुरकर यांना प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

बेलासिल पूल प्रकल्पातील उप प्रमुख अभियंता श्री. राजेश मुळे, कार्यकारी अभियंता श्री. नामदेव रावकाळे, सहायक अभियंता श्री. संदीप पाटील, दुय्यम अभियंता श्री. कृपाल खोत, दुय्यम अभियंता श्री. अभिषेक देवळेकर यांना प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

सफेद पूल प्रकल्पातील तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. नरेश मेघराजानी, सहायक अभियंता श्री. अमीत भंडारी, दुय्यम अभियंता श्री. चंद्रकांत व्हटकर, दुय्यम अभियंता श्री. आशीषकुमार जैन यांना प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

एम एम आर डी ए MMRDA

महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र सरकारचा उपक्रम)

Maha Mumbai Metro Operation Corporation

४ था मजला, नामट्री इमारत, प्राधिकरणाच्या नवीन इमारतीजवळ, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
वेबसाईट: https://mahatenders.gov.in./www.mmmocl.co.in

ई-निविदा सूचना

महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादित (MMMOCL) द्वारे खालील नमुद निविदेकरिता पात्र निविदाकारांकडून खुल्या ई-निविदा मागविण्यात येत आहेतः

निविदा/ बीडचे नाव	TSS येथील HSCB आणि NI च्या भूमिगत दोषग्रस्त DC केबल्सची ओळख व दुरुस्ती.
संपर्क ई-मेल	dp@mmmocl.co.in
ई-निविदा डाउनलोड करण्याचा कालावधी	०२.०२.२०२६ (१८:०० वाजल्यापासून) ते २३.०२.२०२६ (१५:०० वाजेपर्यंत)
निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख	२३.०२.२०२६ (१५:०० वाजेपर्यंत)

निविदा दस्ताऐवज प्राधिकरणाच्या https://mahatenders.gov.in/nicgep/app या ई-पोर्टलवरुनच उपलब्ध होतील. विस्तृत माहितीकरीता तसेच त्यानंतरच्या परिशिष्ट / शुध्दिपत्रकाकरिता (जर असल्यास), कृपया वरील नमूद ई-पोर्टलवर भेट द्यावी.
अतिरिक्त माहितीकरिता ई-निविदा २४x७ मदत कक्षास खालील क्रमांकावर संपर्क साधावा: support-eproc@nic.in अथवा दूरध्वनी क्र. ०१२०-४००१००२/००५ आणि ०१२०-६२७७७८७

दिनांक : ०२.०२.२०२६
स्थळ: मुंबई

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक,
म. मुं. मे. सं. म. म.

स्वच्छ सर्वेक्षणात उत्तम कामगिरीसाठी मुंबई 'स्वच्छ आणि सुंदर' ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अश्विनी जोशी यांचे आवाहन

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

केंद्र शासनाकडून स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ चा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. यंदाच्या स्वच्छ सर्वेक्षणात बृहन्मुंबईची उत्तम कामगिरी असावी, यासाठी संपूर्ण मुंबई महानगरात स्वच्छता राखून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांनी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने केले आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील घनकचरा, पर्जन्यजल, मलनिस्सारण प्रचालन, मुंबई सांडपाणी विल्हेवाट प्रकल्प, शिक्षण आदी विभागांनी बृहन्मुंबई क्षेत्रात स्वच्छ सर्वेक्षणासाठी उत्तम समन्वयातून प्रभावी उपाययोजना कराव्यात. मूल्यमापन व अहवालासाठी आवश्यक असलेली सर्वसमावेशक, अचूक व अद्ययावत माहिती संकलित करावी, असे निर्देशही श्रीमती जोशी यांनी दिले आहेत. स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात काल (दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६) बैठक पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या. उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) श्री. किरण दिघावकर यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी यावेळी उपस्थित होते. केंद्र शासनाच्या गृहनिर्माण आणि नागरी कार्य मंत्रालयाच्या वतीने शहरांमधील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि नागरिक सहभागाचे मूल्यांकन करून क्रमवारी लावण्याच्या उद्देशाने दरवर्षी स्वच्छ सर्वेक्षणाचे आयोजन केले जाते. यंदा स्वच्छ सर्वेक्षणाचे दहावे वर्ष आहे. उत्तम स्वच्छता, कचरा वर्गीकरण, संकलन आणि वाहतूक, प्रक्रिया आदी बाबींवर या अंतर्गत मूल्यमापन केले जाते. स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ साठी केंद्र शासनाकडून 'स्वच्छता की नई पहल-बढाए हाथ, करे सफाई साथ' ही मध्यवर्ती संकल्पना मांडण्यात आली आहे. या अंतर्गत, स्वच्छतेसंदर्भात नागरिकांचा अभिप्राय आणि पडताळणीला अधिक महत्व देण्यात आले आहे. यानुसार, संकेतस्थळ आणि ॲप्सच्या माध्यमातून वर्षभर डिजिटल अभिप्राय संकलित केले जातील. उघड्यावर शौच व लघवी करण्यावर प्रतिबंधाच्या अनुषंगाने नवीन मानके निश्चित करण्यात आली आहेत. तसेच, शाळांमधील वर्तन बदल कार्यक्रमांवर (Behaviour Change Programs) भर देण्यात येत आहे. यंदाच्या सर्वेक्षणात किनारपट्टीवरील शहरांसाठी स्वतंत्र मूल्यांकन निकष लावण्यात आले आहेत. पर्यटन / वारसा / धार्मिक स्थळे आणि जास्त वर्दळीची सार्वजनिक ठिकाणे यांच्याशी संबंधित स्वच्छतेच्या निकषांवरही विशेष भर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पार पडलेल्या बैठकीत डॉ. अश्विनी जोशी यांनी सांगितले की, बृहन्मुंबई (मुंबई शहर आणि उपनगरे) क्षेत्रातील घनकचऱ्याचे प्रभावी आणि शास्त्रोक्त पद्धतीने योग्य व्यवस्थापन करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून अविरतपणे प्रयत्न केले जात आहेत. स्वच्छ सर्वेक्षणात या प्रयत्नांचे योग्य मूल्यमापन दिसण्यासाठी प्रभावीपणे उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी, घनकचरा व्यवस्थापन, मलनिस्सारण प्रचालन व प्रकल्प, मुंबई सांडपाणी विल्हेवाट प्रकल्प, पर्जन्य जलवाहिनी तसेच शिक्षण विभाग आदी विभागांनी समन्वयातून प्रभावी उपाययोजना कराव्यात. मूल्यमापन व अहवालासाठी आवश्यक असलेली सर्वसमावेशक, अचूक व अद्ययावत माहिती संकलित करावी. तसेच, यंदा सर्वेक्षणात नागरिक सहभाग व शाळा-आधारित उपक्रमांवर विशेष भर देऊन नागरिक व विद्यार्थ्यांचा या प्रक्रियेत सहभाग सुनिश्चित करावा.

ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
Phone: +91 8433508283 | Website: www.rathi.com

ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00011150** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger.net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स श्री शांतीनाथ एंटरप्रायझेस (कर्जदार) गाला क्रमांक ९, मोहम्मदअली कंपाउंड मालवणी, गेट क्रमांक ६, गुडलक सलूनजवळ, ए एच मार्ग, मुंबई-४०००९५ (२) श्री. सुनील कुमार फूलचंद जैन (सह-कर्जदार) ४०४, चामुंडा ज्वेल, तीन डोंगरी, यशवंत नगर, रोड क्रमांक ०१, गोरेगाव डब्ल्यू-४००१०४	
सह-कर्जदाराचे नाव: (३) श्रीमती सीमा सुनील जैन (सह-कर्जदार) ४०४, चामुंडा ज्वेल, तीन डोंगरी, यशवंत नगर, रोड क्रमांक ०१, गोरेगाव डब्ल्यू-४००१०४	
मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्रमांक ४०४, चौथा मजला, चामुंडा ज्वेल सीएचएसएल, सुंदर नगर रोड, दालमिया कॉलेजजवळ, गोरेगाव पश्चिम, मुंबई -४०००६४, मुंबई, महाराष्ट्र, भारत.	
थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह)	रु. १,९१,६६,६४२ /- (रुपये एक कोटी एक्याण्णव लाख सहासष्ट हजार सहाशे बेचाळीस फक्त)
लिलावाची तारीख	१० मार्च २०२६
राखीव किंमत	रु. १,९३,९५,९८० /- (रुपये एक कोटी त्रियाण्णव लाख पंच्याण्णव हजार एकशे ऐंशी फक्त)
कमाईची रक्कम ठेव	राखीव किमतीच्या १०%
किमान बोली वाढीची रक्कम	रु. १०,०००/- (फक्त दहा हजार रुपये)
इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ	२ मार्च २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत
केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी.	६ मार्च २०२६ केवायसी कागदपत्रांसह दुपारी ४.०० वाजेपर्यंत
ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ	१० मार्च २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.
तारीख: ०३ फेब्रुवारी २०२६ आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण: मुंबई अधिकृत स्वाक्षरीकर्ता

ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
Phone: +91 8433508283 | Website: www.rathi.com

ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00008134 & APPL00011768** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger.net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स केदारेश्वर कार्गोमूव्हर्स (कर्जदार), खोली क्रमांक १८४०, शिव कॉलनी लेन क्रमांक ३, सेक्टर १, ऐरोली नवी मुंबई, ठाणे: ४००७०८.	
सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. अजय तुकाराम मोरे (सह-कर्जदार), फ्लॅट क्रमांक ११०३, ११ वा मजला, इमारत क्रमांक एल-०५, हंसध्वनी गृहसंकुल, सामूहिक गृहनिर्माण योजना (एलआयजी), प्लॉट क्रमांक ९, सेक्टर १५, कळंबोली तलावाजवळ, कळंबोली, नवी मुंबई: ४१०२१८. (३) सुश्री दीपाली अजय मोरे (सह-कर्जदार), फ्लॅट क्रमांक ११०३, ११ वा मजला, इमारत क्रमांक एल-०५, हंसध्वनी गृहसंकुल, सामूहिक गृहनिर्माण योजना (एलआयजी), प्लॉट क्रमांक ९, सेक्टर १५, कळंबोली तलावाजवळ, कळंबोली, नवी मुंबई: ४१०२१८.	
मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्रमांक ११०३, ११ वा मजला, इमारत क्रमांक एल-०५, हंसध्वनी गृहसंकुल, सामूहिक गृहनिर्माण योजना (एलआयजी), प्लॉट क्रमांक ०९, सेक्टर १५, कळंबोली तलावाजवळ, शिव मंदिर रोडजवळ, कळंबोली, नवी-मुंबई, जिल्हा – रायगड, रायगड, महाराष्ट्र, भारत	
थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह)	रु. १९,२३,९४९/- (रुपये एकोणीस लाख तेवीस हजार नऊश